MHRT060009872022

सं.फौ.ख.क्र. ४४५/२०२२
निशाणी ६ खाली

# न्यायनिर्णय

(पारित दिनांक ०१/०३/२०२३)

१. दिनांक १३/०१/२०२२ रोजी १०.०० वाजणेच्या दरम्यान मौजे भिवबंदर येथे प–याकिनारी, ता–दापोली येथे आरोपी संतोष राजाराम मोरे याने गैरकायदा विनापरवाना २०० लिटर मापाचे गुळ नवसागर मिश्रीत रसायनाने भरलेले ३ प्लास्टीक बॅरल, २०० लिटर मापाचे एक लोखंडी पत्र्याचे भट्टी बॅरल, २० लिटर मापाचे दोन प्लास्टीक कॅन गावठी हातभट्टीचे दारुने भरलेले बेकायदेशिरपणे ताबेकब्जात बाळगले म्हणून त्याच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(इ)(फ) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला चालविण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षाचे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि बचाव पक्षाचे विद्वान वकील यांचा युक्तिवाद ऐकला.

३. वरील प्रकरणाचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारात उद्भवले व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दिनांक १३/०१/२०२२ रोजी १०.०० वाजणेच्या दरम्यान मौजे भिवबंदर येथे प–याकिनारी, तालुका दापोली येथे आरोपीचे ताब्यात २०० लिटर मापाचे गुळ नवसागर मिश्रीत रसायनाने भरलेले ३ प्लास्टीक बॅरल, २०० लिटर मापाचे एक | |

| | | |
|---|---|---|
| | लोखंडी पत्र्याचे भट्टी बॅरल, ४० लिटर गावठी हातभट्टीची दारु बेकायदा बाळगली व त्याद्वारे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५ (ई)(फ) अन्वये गुन्हा केला ही बाब अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ...नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्रमांक १ व २ करीता :</u>

४. या प्रकरणातील पंच सा.क्र.१ सानिया संजय मोरे हीने तिचे पुराव्यात सांगितले की, ती देवळात जात असताना पोलीस तिला भेटले व त्यांनी एका को-या कागदावर सही करायला सांगितले. तिने सही केली. तो कागद कशाचा होता हे तिला माहित नाही. तिचे समक्ष दारुबंदी कार्यवाही झाली नाही. विव्दान सरकारी वकिलांनी या साक्षीदाराचा तपशीलवार उलटतपास घेतला. परंतु दोषहार्य तथकथन तिने मान्य केले नाही.

५. या प्रकरणात रासायनिक तपासणीचा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. त्यामूळे जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हातभट्टीची दारू होती ही बाब रासायनिक तपासणी अहवालाअभावी सिध्द होत नाही.

६. आरोपीकडून जप्त करणेत आलेल्या नमुन्यावर राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक रत्नागिरी यांचा गुन्हा रजिस्टर क्रमांक ११/२०२२ नमुद करण्यात आला होता याबाबतचा कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. पंचनामा करतेवेळी गुन्हा क्रमांक नोंदला नव्हता. त्यामुळे पंचनाम्यात नमुन्याच्या लेबलवर गुन्हा क्रमांक टाकल्याचा उल्लेख नाही. आरोपी विरुध्द गुन्हा नोंद झाल्यानंतर सदर गुन्हा क्रमांक हा आरोपी कडून जप्त करणेत आलेल्या नमुन्यावर टाकण्यात आला होता याबाबत राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक

रत्नागिरीच्या पोलीसांनी कुठलाही पंचनामा केलेला नाही. अशा परिस्थितीत आरोपीकडून जप्त केलेला नमुना आणि रासायनिक तपासणीसाठी पाठविणेत आलेला नमुना हा एकच होता याबाबत संशय निर्माण होतो. या संशयाचा फायदा आरोपीला मिळतो.

७. वरील सर्व कारणामुळे सर्व संयुक्तिक साशंकतेच्या पलिकडे गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्षास यश येत नाही. म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

१. आरोपी संतोष राजाराम मोरे यांची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई)(फ) खालील शिक्षेसपात्र अपराधातुन फौजदारी व्यवहार संहितेचे कलम २५५(१) नुसार निदोष मुक्तता करण्यात येते.
२. आरोपीचे जामीनबंधपत्र रद्द करण्यात आले.
३. जप्त करणेत आलेला मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करण्याचे निर्देश राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक रत्नागिरी यांना देण्यात येते.
४. आरोपीने रक्कम रू. ५०००/– चे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसारचे वैयक्तीक बंधपत्र न्यायालयात सादर करावे.

Anand Yadnyawalkya Borkar
Digitally signed by Anand Yadnyawalkya Borkar
Date: 2023.03.01 18:23:11 +0530

दिनांकः– ०१/०३/२०२३.

( आनंद याज्ञवल्क्य बोरकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, दापोली.

सं.फौ.ख.क्र. ४४५/२०२२

निशाणी ६ खाली

न्यायनिर्णय

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Shri.R.K.Sangare. |
| Court | : Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Dapoli. |
| Date of order. | : 01/03/2023 |
| Order signed by the Presiding Officer on. | : 01/03/2023 |
| Order uploaded on. | : 01/03/2023 |